दै. गोदातीर दि. १५/०६/२५

# नांदेड पोलीस दलातर्फे आदिवासी महिलांकरिता सायबर जनजागृती कार्यशाळा संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पद्धतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलीस प्रशासन चोवीस तास समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विधायक कार्य करण्याकरिता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली मिशन सहयोग ची सुरूवात करण्यात आली.

नाविन्यपूर्ण मिशन समाधान अंतर्गत दिनांक १३ जून रोजी जिल्ह्यातील किनवट येथील ग्रामीण भागातील आदिवासी महिला यांना सायबर जनजागृती उपक्रमासाठी मायक्रो फायनान्स यांनी सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण यांना गेस्ट लेक्चरर म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

सदर कार्यशाळेत किनवट तालुक्यातील अंदाजे १५० आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांनी सहभाग घेतला होता. सदर महिलांना पोउपनि मारोती चव्हाण व अंमलदार यन्नावार यांनी सायबर गुन्ह्यांचे प्रकार, सोशल मिडिया वापरताना घ्यावयाची काळजी, पासवर्ड सुरक्षितता, ऑनलाईन फसवणुक, डिजिटल फुटप्रिंट याबाबत उदाहरणांसह सविस्तर माहिती देण्यात आली.